**शिक्षक प्रशिक्षण या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अनुसूचित जाती उपयोजना (SCSP Head) या लेखाशीर्षातंर्गत दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अनुवि- ४११७/(८७/१७)/प्रशिक्षण**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२,
तारीख:- २८ मार्च, २०१८

<u>वाचा</u> - **१. मनुष्यबळ व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ ४४-०७/२०१७-ईई-९, दि.२३.०२.२०१८.**
**२. शासन निर्णय क्रमांकः अनुवि- ४११७/(८७/१७)/प्रशिक्षण, दि.१७ मार्च, २०१८**
**३. शासन निर्णय क्रमांक-पुनर्वि-२८१७/(५३/१७)/अर्थसंकल्प, २८/३/२०१८**

**<u>प्रस्तावना -</u>**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाने शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत दुसरा हप्ता अनुसूचित जाती उपयोजना (SCSP Head) या लेखाशीर्षातंर्गत दि.२३/०२/२०१८ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिला असून, सदर निधी दि.१७/३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. तथापि सदर लेखाशीर्षाखाली सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी केंद्र व राज्यासाठी अर्थसंकल्पीत केलेला निधी कमी पडत असल्याने, पूर्ण निधी वितरीत करण्यात आला नव्हता. त्यानुसार कमी पडत असलेला निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून, सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय -</u>**

शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या (SCSP Head) लेखाशीर्षाखाली केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता दुसरा हप्ता रु.१८४.५८ लाख वितरित केलेला आहे. त्यानुसार राज्य हिस्सा (४०%) रु.१२३.०५ लाख असा एकूण रु.३०७.६३ लाख इतका होत आहे. तथापि, सदर लेखाशीर्षाखाली केंद्र हिस्सा रु.१४८.३३ लाख व राज्य हिस्सा रु.९८.८८ लाख असा एकूण रु.२४७.२१ लाख इतकाच निधी शिल्लक असल्याने सदर निधी संदर्भ क्र.२ येथील दि.१७/३/२०१८ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे. दुसऱ्या हप्त्यातील उर्वरित केंद्र हिस्सा रु.३६.२५ लाख व राज्य हिस्सा रु.२४.१७ लाख असा एकूण रु.६०.४२ लाख इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून, सदर निधी पुढील विवरणपत्रानुसार वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| दुसला हप्ता | केंद्र शासनाच्या पत्राच दिनांक | केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी | दि.१७/३/२०१८ च्या शा.निणयान्वये वितरीत निधी | वितरणासाठी उर्वरित निधी | | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | |
| SCSP Head | दि.२३/२/२०१८ | १८४.५८ | २४७.२१ | ३६.२५ | २४.१७ | ६०.४२ |

केंद्र शासनाने सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता वितरीत केलेल्या दुसऱ्या हप्त्यामधील उर्वरित **केंद्र हिस्सा रु.३६.२५ लाख** मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ७८९ (०१) अनुसूचित जाती उपयोजना (०१) (०१) सर्वशिक्षा अभियान योजना (अनुसूचित जाती उपयोजना)केंद्र हिस्सा (२२०२आय०७६), ३१ सहायक व **राज्य हिस्सा रु.२४.१७ लाख** मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८०० इतर खर्च, (००) (०६) सर्वशिक्षा अभियान योजना (विशेष घटक योजना)(केंद्र पुरस्कृत योजना)राज्य हिस्सा (२२०२३०८३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षातून सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतूदीतून वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, ज्या उद्दिष्टांसाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करण्यात यावा. तसेच, सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०जून, २०१७, दि.०८ ऑगस्ट, २०१७ व दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ३३६/व्यय-५, दिनांक २३ मार्च, २०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१९५०४४२८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2018.03.28 19:52:47 +05'30'

( बी.आर.माळी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र शासन, पुणे
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे

४. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे

५. संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे

६. संचालक (प्रौढ व अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य, पुणे

७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१/२), मुंबई/नागपूर

८. महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.

१०.सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD)

११.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१२.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३.वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.

१४.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर रक्कम बी.डी.एस.प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

१५.निवडनस्ती (प्रशिक्षण)